**कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गात**
**तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात पदोन्नती**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०२१/ 0935 /प्र.७**
**दिनांक :- 26 MAR 2021**

**संदर्भ-**
१ प्राधिकरणाचे आदेश क्र. प्राधि./पदोन्नती/२०१९/२८९४/प्र.७,दि. ३०.१०.२०१९
२ मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचे दि.०५.११.२०१९ रोजीचे आदेश
३ प्राधिकरणाचे आदेश क्र. प्राधि./पदोन्नती/२०२१/०१२१/प्र.७, दि. १३.०१.२०२१
४ मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचे दि.०९.०२.२०२१ रोजीचे आदेश

**आ दे श -**

प्राधिकरणाच्या दि.३०.१०.२०१९ रोजीच्या संदर्भ १ वरील आदेशान्वये श्रीम.उषा टेंभूर्णे, उपअभियंता/नागपूर मंडळ यांची कार्यकारी अभियंता/नागपूर मंडळ या पदावर कार्यरत असलेल्या श्रीम दिप्ती काळे यांच्या बदलीने रिक्त झालेल्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली होती. मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्या दि.०५.११.२०१९ रोजीच्या संदर्भ २ वरील आदेशान्वये श्रीम. दिप्ती काळे, कार्यकारी अभियंता/नागपूर मंडळ यांच्या अमरावती मंडळात झालेल्या बदलीस मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली असल्यामुळे नागपूर मंडळात कार्यकारी अभियंता या संवर्गातील पद रिक्त नसल्याने, श्रीम. उषा टेंभूर्णे, उपअभियंता/नागपूर मंडळ यांना नागपूर मंडळातील कार्यकारी अभियंता या संवर्गातील पदोन्नतीच्या पदावर रुजू होऊ शकल्या नाहीत.

श्रीम. उषा टेंभूर्णे उपअभियंता/नागपूर मंडळ या पदोन्नती आदेशातील नमूद केलेल्या अटी व शर्तीनूसार नागपूर मंडळातील कार्यकारी अभियंता या संवर्गातील पदावर रुजू झालेल्या नसल्यामुळे विधी सल्लागार/प्रा. यांच्या प्राप्त अभिप्रायानूसार प्राधिकरणाच्या दि.१३.०१.२०२१ रोजीच्या संदर्भ ३ वरील आदेशान्वये श्रीम उषा टेंभूर्णे, यांना कार्यकारी अभियंता या संवर्गातून उपअभियंता या संवर्गात पदावनत करण्यात आले आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने श्रीम उषा टेंभूर्णे यांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे याचिका दाखल केली असून,याचिका क्र.३४८/२०२१ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्या दि.०९.०२.२०२१ रोजीच्या संदर्भ ४ वरील आदेशान्वये श्रीम. दिप्ती काळे, कार्यकारी अभियंता/नागपूर मंडळ यांनी त्यांच्या बदलीविरोधात दाखल केलेली याचिका फेटाळली असून, श्रीम उषा टेंभूर्णे यांनी त्यांच्या पदावनतीबाबत प्राधिकरणाकडे निवेदन सादर करुन, सदर निवेदनावर प्राधिकरणाने योग्य निर्णय घेण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने श्रीम. दिप्ती काळे, यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल केलेले असून, मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या दि.१५.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्रीम. दिप्ती काळे यांनी दाखल केलेली याचिका फेटाळली आहे. त्यानूसार विधी सल्लागार/प्रा. यांनी श्रीम दिप्ती काळे,

कार्यकारी अभियंता/नागपूर मंडळ यांची कार्यकारी अभियंता/अमरावती मंडळ या रिक्त पदावर बदली झालेली असल्याने, त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर कार्यकारी अभियंता/नागपूर मंडळ हे पद रिक्त होणार असल्याने, श्रीम उषा टेंभूर्णे, यांचे संदर्भ ३ वरील पदावनतीबाबतचे आदेश रदद करुन, सदर रिक्त पदावर श्रीम उषा टेंभूर्णे, उपअभियंता/नागपूर मंडळ यांना कार्यकारी अभियंता/नागपूर मंडळ या रिक्त पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्याबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

सदर बाब विचारात घेता, श्रीम. उषा टेंभूर्णे, यांचे कार्यकारी अभियंता या संवर्गातून उपअभियंता या संवर्गात पदावनत केलेले संदर्भ ३ वरील आदेश रदद करुन, या आदेशान्वये श्रीम. उषा टेंभूर्णे, उपअभियंता/नागपूर मंडळ यांना कार्यकारी अभियंता/नागपूर मंडळ या पदावरील श्रीम दिप्ती काळे यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांनी श्रीम.उषा टेंभूर्णे, यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू करुन घेण्याबाबतची कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा व मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांना सदर वस्तुस्थिती अवगत करावी.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.**
**यांचे मान्यतेने.**

(राजकुमार सागर)
**सचिव / प्राधिकरण**

**प्रति,**
**श्रीम उषा टेंभूर्णे, उपअभियंता/नागपूर मंडळ**
(मुख्य अधिकारी / नागपूर मंडळ यांचेमार्फत)

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१) मुख्य अभियंता-१,२,३/प्रा.
२) विधी सल्लागार/प्रा.
३) वित्त नियंत्रक/प्रा.
४) मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ/अमरावती मंडळ

**प्रत:**
मुख्य लेखाधिकारी/नागपूर मंडळ/अमरावती मंडळ
प्रशासकीय अधिकारी-१,२/प्रा./नागपूर मंडळ/अमरावती मंडळ
**प्रत**:प्रशासन-६,८,९,१०,११,१२,१३,१४/प्रा.

ICT cell/A